सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३१७ | रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १४७३००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३५६००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११३५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३३०/-
भाव प्रती १० ग्राम

# रक्षाबंधनापूर्वी सोन्याच्या दरात मोठा बदल

## खरेदीपूर्वी जाणून घ्या एक तोळ्याचा आजचा भाव काय?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून देशांतर्गत सराफ बाजारात सोने आणि चांदीच्या दरात सतत वाढ होत आहे. या आठवड्यात झालेल्या दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त ताण पडला आहे. तर दुसरीकडे गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सोन्याचा आजचा शनिवार, ८ ऑगस्ट रोजी १० ग्रॅम २४ कॅरेटचा भाव एक लाख ५१ हजार ८६०, तर २२ कॅरेट १० ग्रॅमचा भाव एक लाख ३९ हजार २०५ रुपये राहिला. तर चांदीचे दर दोन लाख ३२ हजार २०० रुपये प्रतिकिलो राहिला. उत्पादन शुल्क, राज्य कर आणि मेकिंग शुल्कामुळे सोन्याच्या दागिन्यांचे दर भारतभर बदलतात.

**देशातील आजचे सोने-चांदीचे दर**

सोने १० ग्रॅम २४ कॅरेट दर : एक लाख ५१ हजार ८६० रुपये.
सोने १० ग्रॅम २२ कॅरेट दर : एक लाख ३९ हजार १०५ रुपये.
चांदी प्रतिकिलो दर : दोन लाख ३१ हजार २०० रुपये.

सोने खरेदी करताना सराफांकडून असे विचारले जाते, की तुम्हाला २२ कॅरेटचे सोने खरेदी करायचे, की २४ कॅरेटचे? त्यामुळे तुम्ही देखील हे जाणून घेणे आवश्यक आहे, की तुम्ही खरेदी करताय ते सोने काय शुद्धतेचे आहे. जर तुम्हाला कॅरेटबाबत माहिती असेल तर ही बाब चांगली आहे . जर तुम्हाला माहिती नसेल तर तुम्हाला ही माहिती नक्कीच उपयोगी पडेल.

२४ कॅरेट सोने ९९.९% शुद्ध आहे आणि २२ कॅरेट अंदाजे ९१% शुद्ध असते. २२ कॅरेट सोन्यात तांबे, चांदी, जस्त यांसारख्या ९% इतर धातूंचे मिश्रण करून दागिने तयार केले जातात. २४ कॅरेट सोने शुद्ध असले, तरी त्याचे दागिने बनविता येत नाहीत. त्यामुळे बहुतेक दुकानदार २२ कॅरेटमध्ये सोने विकतात.

## आजचे अभीष्टचिंतन


**श्री. अजय रोडगे**
अमळनेर


**ॲड. नंदलाल सूर्यवंशी**
अमळनेर


**श्री. हितेश गोहिल**
अमळनेर


**श्री. राजेश पांडे**
अमळनेर / पुणे


**श्री. कैलास पाटील**
अमळनेर


**श्री. रोहित सोनार**
अमळनेर

# रेल्वे स्टेशनसमोरील कोल्ड्रिंक्स दुकानावर 'एफडीए'चा छापा

## विमल, पान पराग, रजनीगंधा गुटख्याचा साठा जप्त; दुकानमालकास अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रेल्वे स्टेशनसमोरील द्वारका कोल्ड्रिंक्स या दुकानातून विमल गुटखा, पान पराग व रजनीगंधा मसाल्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्या अन्न व औषध प्रशासन विभागाला (एफडीए) मिळाली होती. त्यानंतर या विभागाच्या अधिकाऱ्यांनी या दुकानावर छापा घालून गुटख्याच्या साठ्यासह दुकानमालकास अटक केली. या कारवाईत विविध कंपन्यांचे एकूण १२० गुटखा पाऊचही जप्त करण्यात आले.

याबाबतची माहिती अशी, की गुरुवार, दि. ६ ऑगस्ट रोजी दुपारी पावणे दोनच्या सुमारास अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आकाश कैलास बोऱ्हाडे यांनी रेल्वे स्टेशनसमोरील द्वारका कोल्ड्रिंक्स या दुकानावर छापा टाकला. त्यावेळी दुकानात ७९ विमल मसाला पाऊच, १० पान पराग मसाला पाऊच आणि ३१ रजनीगंधा मसाला पाऊच असा साठा आढळून आला. याबाबत दुकानमालक अंकित संजय अग्रवाल (वय २८, रा. डेविल्स पार्क, स्मार्ट बाजारसमोर, अमळनेर) यास अटक करण्यात आली आहे.

अंकित अग्रवाल याने अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ मधील विविध कलमांसह अन्नसुरक्षा आयुक्तांच्या १३ जुलैच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच भारतीय न्यायसंहितेतील कलम १२३, २७५, २७४ व २२३ अन्वयेही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील विक्रेता, उत्पादक व पुरवठादार यांची साखळी तसेच अवैध मार्गाने आर्थिक लाभ मिळविण्यामागील संघटित गुन्हेगारीचा शोध घेऊन अन्नसुरक्षा कायदा व मकोका अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी अन्नसुरक्षा अधिकारी बोऱ्हाडे यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत केली आहे. या प्रकरणाचा सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे तपास करीत आहेत.



अमळनेर : दरवर्षीप्रमाणे संताजी चौक, माळीवाडा येथील ओम साई सेवा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली अमळनेर ते शिर्डी पायी पदयात्रा शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सकाळी भक्तिमय वातावरणात शिर्डीकडे रवाना झाली.

# 'साई'च्या जयघोषात अमळनेर ते शिर्डी पायी दिंडी रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दरवर्षीप्रमाणे संताजी चौक, माळीवाडा येथील ओम साई सेवा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली अमळनेर ते शिर्डी पायी पदयात्रा शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सकाळी भक्तिमय वातावरणात शिर्डीकडे रवाना झाली. साईबाबांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. ढोल-ताशे आणि ध्वनिवर्धकाच्या गजरात निघालेल्या दिंडीमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. पदयात्रेच्या प्रारंभी पालखी पूजन नगरसेवक अनिल महाजन यांच्या हस्ते, तर रथ पूजन क्षत्रिय पारोळा यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मनोहर महाजन, नगरसेवक श्रीराम चौधरी, नगरसेवक राजू फापोरेकर, माजी नगरसेवक संजय कौतिक पाटील, माजी नगरसेवक भाऊसाहेब महाजन, सौ. वसुंधराताई लांडगे, अधिवक्ता सौ. तिलोत्तमाताई पाटील, मनोज शिंगाणे, सुहास भामरे, गणेश महाजन आदी उपस्थित होते.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे स्वागत साईबाबांची मूर्ती व छायाचित्र भेट देऊन करण्यात आले. समितीचे अध्यक्ष संजय बापू चौधरी, डॉ. राजेंद्र पिंगळे, सुभाष पाटील, जगन चौधरी, हरिष चौधरी, योगेश मकवाना, अरुण पाटील, यशवंत शिंगाने, यशवंत चौधरी, परेश चौधरी, नंदू शेठ चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. 'साईनाथ महाराज की जय', 'सबका मालिक एक' अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. साईभक्तांच्या उत्साहपूर्ण सहभागात पायी दिंडीने अमळनेरहून प्रस्थान केले. पहिल्या टप्प्यात दिंडी धुळे येथे मुक्कामी रवाना झाली. तेथून पुढील प्रवास करत ही पदयात्रा शिर्डी येथे पोहोचणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही ओम साई सेवा समितीच्या या पायी पदयात्रेत साईभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असून, संपूर्ण प्रवासात भक्तिमय वातावरण राहणार आहे.

# सरकारच्या धोरणांच्या निषेधार्थ अमळनेरला आज मशाल मोर्चा

**अतिवृष्टीग्रस्तांना ५० हजारांची मदत, शेतमालाला हमीभाव व बॅलेट पेपरवर मतदानाची मागणी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : क्रांती दिनानिमित्त रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता शहरात 'चलो तिरंगा चौक' या घोषणेसह मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासोबतच शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मराठा सेवा संघ, मुस्लिम यूथ सेवा फाऊंडेशन, संभाजी ब्रिगेड, भारत मुक्ती मोर्चा, एनएसयूआय, निवृत्त सेवा संघटना, पुरोगामी क्रांती दल, प्रहार संघटना आणि साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान यांच्यासह विविध संघटनांतर्फे हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

महागाई, पेट्रोल-डिझेल व वीज दरवाढ, महागडी औषधे, बेरोजगारी, शिक्षणातील पेपरफुटी, शाळा बंद होण्याचे प्रकार, भ्रष्टाचार, जातीय ध्रुवीकरण, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, महिलांवरील अत्याचार तसेच रस्ते व पुलांच्या दुरवस्थेसह विविध मुद्दे मोर्चातून मांडण्यात येणार आहेत. अमळनेर तालुक्यात ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अतिवृष्टीग्रस्तांना तत्काळ ५० हजार रुपयांची मदत देण्यात यावी, शहर व ग्रामीण भागातील नुकसानीचे त्वरित पंचनामे करावेत, तसेच शहरात स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी व वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. याशिवाय पाडळसरे धरणासाठी दरवर्षी ५०० कोटी रुपयांचा निधी, शेतमालाला हमीभाव आणि केंद्रीय पीक विमा योजनेतील पीक कापणी प्रयोगाचा निकष रद्द करण्याची मागणी करण्यात येणार आहे. निवडणुकीत ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे, अशीही मागणी आहे.

या मोर्चात अमळनेरकर नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भुसावळ-दादर खानदेश एक्स्प्रेस १२ ऑगस्टला अमळनेरहून सुटणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात इगतपुरी-भुसावळ रेल्वेमार्गावर भादली ते जळगावदरम्यान पाचव्या रेल्वेमार्गाच्या कामाला वेग आला आहे. या प्रकल्पांतर्गत भादली रेल्वेस्थानकाच्या यार्डची पुनर्रचना करण्याबरोबरच नव्या पाचव्या रेल्वेमार्गासाठी आवश्यक जोडण्या उपलब्ध करून देण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी भादली स्थानकावर नॉन-इंटरलॉकिंगचे महत्त्वपूर्ण काम केले जाणार आहे. त्यामुळे बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी धावणाऱ्या भुसावळ-दादर खानदेश एक्स्प्रेसच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

भादली येथील कामामुळे गाडी क्रमांक १९००४ भुसावळ-दादर खानदेश एक्स्प्रेस दि. १२ ऑगस्ट रोजी पूर्णतः रद्द करण्याची घोषणा यापूर्वी करण्यात आली होती. मात्र, या निर्णयामुळे भुसावळ, जळगाव आणि परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने नियोजनात बदल केला आहे. आता ही गाडी पूर्णपणे रद्द न करता अंशतः रद्द करण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार गाडी क्रमांक १९००३ दादर-भुसावळ खानदेश एक्स्प्रेस दि. १२ ऑगस्ट रोजी दादरहून आपल्या नियोजित वेळेनुसार रवाना होईल. मात्र, ही गाडी भुसावळपर्यंत न जाता अमळनेर स्थानकापर्यंतच धावणार आहे. त्यामुळे अमळनेरनंतर भुसावळपर्यंतचा प्रवास या दिवशी रद्द राहणार आहे. या बदलामुळे दादरहून खानदेशकडे येणाऱ्या प्रवाशांनी अमळनेरनंतरच्या पुढील प्रवासासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

पान २ वर

## दिनविशेष

९ ऑगस्ट

- चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या साथीदारांनी काकोरी रेल्वे स्थानकावर सरकारी खजिना लुटला.
- क्रांती दिन
- भाभा अणुसंशोधन केंद्र संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्लीच्या औद्योगिक संशोधन संस्थेतर्फे सुवर्ण महोत्सवी पुरस्कार प्रदान





भाजप नेते, अमळनेरचे भूमिपुत्र
**मा. श्री. राजेश दादा पांडे**

- सरचिटणीस : प्रदेश भाजप
- विश्वस्त : नॅशनल बुक ट्रस्ट (भारत सरकार)
- सदस्य : व्यवस्थापन समिती (रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी)
- चेअरमन : नॅशनल युवा को-ऑप. सोसायटी,
- मुख्य संयोजक : पुणे पुस्तक महोत्सव

यांना वाढदिवसाच्या
**मन:पूर्वक शुभेच्छा...!**

शुभेच्छुक : श्री. सुधाकर राजाराम कुलकर्णी, अमळनेर
श्री. विनीत सुधाकर कुलकर्णी, अमळनेर

## संपादकीय

### कुंभमेळा : समस्यांचा गोतावळा

पुढचे वर्षभर महाराष्ट्र हा कुंभमेळ्याच्या निमित्ताने चर्चेत आणि प्रसिद्धीच्या झोतात राहाणार आहे. जर कुंभमेळ्याचे उत्तम पद्धतीने व्यवस्थापन झाले तर त्याची सकारात्मक प्रसिद्धी मिळत राहील. मात्र गैरप्रकार, गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार अशा कारणांमुळे कुंभमेळा चर्चेत राहिला तर महाराष्ट्र देशभर गाजत राहील. पुढच्या सहा महिन्यांत प्रत्यक्ष कुंभमेळ्याला प्रारंभ झालेला असेल. परंतु अजूनही कुंभमेळ्याची आवश्यक ती पूर्वतयारी झालेली नाही. खरे तर आता या सर्व पूर्वतयारीची आणि व्यवस्थापनाची रंगीत तालीम सुरू व्हायला हवी होती. परंतु अजून नेपथ्य पूर्ण झालेले नाही. सध्या नाशिक हे कुंभमेळ्यातल्या कामातील भ्रष्टाचारावरून, रस्त्यांवर असलेल्या सर्वाधिक खड्ड्यांवरून गाजते आहेच. विशेष म्हणजे कुंभमेळ्याने जागतिक नकाशावर पोहचणारे नाशिक आपल्याच शेजारच्या महानगरांशी नीट जोडले न गेल्याने आणखीनच वादग्रस्त होत आहे. अगदी मुंबई, नाशिक हा प्रवास अजूनही सुरळीत आणि सुरक्षित झालेला नाही. नाशिक-पुणे महामार्गाचे गेल्या वीस पंचवीस वर्षापासून तीन-तेरा वाजलेले आहेत. नाशिक-पुणे रेल्वे जी दहा वर्षापूर्वीच प्रत्यक्षात यायला हवी होती. त्याचेही भिजत घोंगडे आहे. ही रेल्वे पुढची दहा वर्षे ही आकाराला येण्याची शक्यता दिसत नाही. मुंबईपेक्षाही नाशिक-पुणे प्रवासासाठी दोन्ही महानगरातल्या नागरिकांना प्रचंड मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागतो. शिवाय संभाजीनगर-नाशिक किंवा नाशिक-जळगाव हे महामार्गदेखील कुंभमेळ्याच्या काळात वाहतुकीची मोठी कोंडी करणारे ठरणार आहेत. पेठ, सुरगणा मार्गाने गुजरातला जाणारा महामार्ग किंवा धुळेमार्गे मध्यप्रदेशमध्ये जाणारा महामार्गदेखील या काळात पुरेसा ठरण्याची शक्यता दिसत नाही. प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्याच्या व्यवस्थापनावर लक्ष ठेवलेले आहे. त्यासाठीच शुक्रवार, ७ ऑगस्टला पुन्हा मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात आढावा बैठक झाली. तर दुसरीकडे नाशिक-पुणे रेल्वे सिन्नर, संगमनेरमार्गेच मंजूर करावी यासाठी रविवार, ९ ऑगस्टला नाशिक-पुणे महामार्गावर चक्काजाम आंदोलनाची घोषणाही झालेली आहे. या सर्व समस्यांचा ढीग पाहता नाशिकचा कुंभमेळा सरकारपुढचे सर्वांत मोठे आव्हान ठरण्याची शक्यता आहे.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने काही कोटी लोक या महानगरात येतील. तरी प्रामुख्याने प्रवासासाठी अनुकुल वातावरण म्हणजेच तशा प्रकारचे व्यवस्थापन होऊ शकलेले नाही. खरे तर नाशिक हे एक महत्त्वपूर्ण तीर्थक्षेत्र आहेच. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक त्र्यंबकेश्वरचे ज्योतिर्लिंग तिथे होणारी लाखो भक्तांची गर्दी, साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धशक्तिपीठ असलेले सप्तशृंगी देवीचे मंदिर, प्रभूश्रीरामचंद्रांचा पावनस्पर्श लाभलेला पंचवटीचा परिसर अशा एक ना अनेक धार्मिक कारणांनी नाशिकचे महत्त्व सांगितले जातेच. शिवाय उत्तम हवामान आणि द्राक्षांबरोबरच इतर फळांचे मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन, कांदा, ऊस, गहू, कापूस, याचेदेखील मोठ्या प्रमाणावर उत्पादन या जिल्ह्यात होते. जागतिक महत्त्व असलेले लासलगावचे कांदा मार्केट आणि तिथून होणारी कांद्याची निर्यात या सर्व गोष्टी लक्षात घेऊन केंद्र सरकार नाशिकला जागतिक निर्यात केंद्र करण्याचादेखील प्रयत्न करीत आहे. म्हणजे जागतिक महत्त्व असलेले तीर्थक्षेत्र आणि शेतीउद्योग, व्यापार या माध्यमातूनही जागतिक केंद्र बनवण्याचा प्रयत्न या गोष्टी लक्षात घेतल्या तर नाशिकला पोहचण्यासाठी योग्य दळणवळणाची व्यवस्थाही असू नये हा प्रचंड मोठा विरोधाभास ठरतो. अनेक वर्षांच्या मागणीनंतर ओझरचे विमानतळ केले गेले. नाशिकचे रेल्वे स्थानक जागतिक सोडाच परंतु राष्ट्रीय दर्जाचेसुद्धा होऊ शकलेले नाही. गुजरात आणि नाशिक हा एक मोठा इकोनॉमिक कॉरिडॉर निर्माण होऊ शकतो. त्यासाठी उत्तम दर्जाच्या रस्ते निर्मितीबरोबरच अहमदाबाद किंवा सूरत, नाशिक रेल्वे प्रकल्पसुद्धा खूप मोठ्या उलाढालीला आणि पर्यटन तसेच कृषीमालाच्या आयातनिर्यातीला ही वरदान देणारा ठरू शकतो. अर्थात जिथे नाशिक पुणे रेल्वे होऊ शकलेली नाही. तिथे नाशिक गुजरातशी रेल्वेने जोडले जाण्याची सरकारला इच्छा होणे आणखीनच दूर राहाते. आता गुजरातमधून कुंभमेळ्याला येण्यासाठी अनेकांना रेल्वेने व्हाया मुंबईत नाशिकमध्ये यावे लागणार आहे. दर बारा वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्याच्या अनिवार्य अशा ज्या काही सोयीसुविधा आहेत त्याचे कायमस्वरूपी नियोजन करणे किंबहुना कायमस्वरूपी कुंभमेळा नियोजन प्राधिकरण निर्माण करणे नाशिकसाठी आवश्यक आहे.

केवळ कुंभमेळा आला, की वेगवेगळ्या कामांचा आणि कंत्राटदारांचा गोतावळा निर्माण होतो. घाईगर्दीन कामे उरकली जातात. रस्ते, वीज, बसव्यवस्था यासारख्या तात्पुरत्या सुविधा करून वेळ मारून नेली जाते. परंतु कुंभमेळा ही जर कायमस्वरूपी घटना असेल तर त्याचे उत्तम दर्जाचे कायमस्वरूपी व्यवस्थापन सातत्याने होत राहिले पाहिजे. म्हणजे पुढच्या काही वर्षात येणाऱ्या कुंभमेळ्याची पूर्वतयारी आतापासूनच सुरू होणे आवश्यक ठरते. परंतु सरकारी कारभार आणि वेळ मारून नेणारे सरकार असेच त्याचे स्वरूप पाहायला मिळते. आता संपूर्ण नाशिक आणि परिसर रस्त्यावरच्या खड्ड्यांनी जर्जर झालेला आहे. केवळ आठवडाभरामध्ये पाच जणांचा बळी घेण्याचा विक्रम या नाशिकमध्ये झाला. त्यात एका जवानालाही आपले प्राण गमवावे लागले. ज्या जवानाने देशासाठी हे व्रत स्वीकारले होते. त्याचा बेजबाबदार आणि बेमुर्वतखोर प्रशासनाने बळी घेतला. आता पुन्हा डागडुजी करून खड्डे बुजवण्याची मलमपट्टी सुरू आहे. तर काही ठिकाणी महानगरातल्या रस्त्यांच्या आजुबाजुला किंवा उड्डाणपुलांच्या खाली रंगीबेरंगी चित्र काढून शहराच्या विद्रूपपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न होतो आहे. थोडक्यात सांगायचे तर कुंभमेळा आला, की नाशिकसाठी विकासकामांचे गाजर दाखवले जाते. तेवढ्यापुरती विकासकामे होतात आणि पुन्हा हे महानगर त्याच त्या समस्यांशी संघर्ष करीत राहाते. ही विकासकामे म्हणजे नाशिकच्या तोंडाला पाने पुसण्याचाच प्रकार ठरतो. सध्या नाशिकमधले वातावरण म्हणजे समस्यांचा चक्रव्यूह असेच आहे आणि म्हणूनच नाशिककरांसाठी आला कुंभमेळा समस्यांचा गोतावळा अशाच परिस्थितीचा म्हणावा लागतो.

## १२ ऑगस्टला अमळनेरहून सुटणार

**पान १ वरून :** दुसरीकडे गाडी क्रमांक १९००४ भुसावळ-दादर खानदेश एक्स्प्रेस दि. १२ ऑगस्ट रोजी भुसावळ स्थानकातून सुटणार नाही. ही गाडी अमळनेर स्थानकातून आपल्या नियोजित वेळेनुसार दादरच्या दिशेने रवाना होणार आहे. त्यामुळे भुसावळ ते अमळनेर हा या गाडीचा प्रवास रद्द करण्यात आला असून, अमळनेरनंतर गाडी नियोजित मार्गावर धावणार आहे. भुसावळ, जळगाव किंवा मार्गातील इतर स्थानकांवरून दादरकडे जाणाऱ्या प्रवाशांनी या बदलाची विशेष नोंद घेणे आवश्यक आहे. प्रवासाचे नियोजन करण्यापूर्वी रेल्वेच्या सुधारित वेळापत्रकाची माहिती घेऊनच स्थानकावर पोहोचावे, असे आवाहन करण्यात आले आहे. भादली स्थानकावरील नॉन-इंटरलॉकिंगचे काम हे पाचव्या रेल्वेमार्ग प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. यार्डची पुनर्रचना आणि नव्या मार्गासाठी आवश्यक जोडणीची कामे पूर्ण झाल्यानंतर भविष्यात या मार्गावरील रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. यार्डची पुनर्रचना आणि नव्या मार्गासाठी आवश्यक जोडणीची कामे पूर्ण झाल्यानंतर भविष्यात या मार्गावरील रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच रेल्वेमार्गाची क्षमता वाढल्याने गाड्यांच्या संचालनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. त्यामुळे सध्या प्रवाशांना होणारी तात्पुरती गैरसोय ही भविष्यातील पायाभूत सुविधा बळकटीकरणाच्या कामाचा एक भाग असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# ‘एआय’ने प्रयोगशाळेत पहिल्यांदाच बनविला नवा व्हायरस!

## मानवाला धोका की वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आता केवळ मजकूर लिहिणे, कोडिंग करणे किंवा चित्रे बनवण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. ‘एआय’ने आता विज्ञानाच्या जगात एक असे पाऊल टाकले आहे, ज्याने संपूर्ण वैज्ञानिक विश्वाला अचंबित केले आहे. अमेरिकेतील स्टॅन्फोर्ड युनिव्हर्सिटीतील वैज्ञानिकांच्या मदतीने ‘एआय’ने प्रयोगशाळेत अगदी नवीन ‘व्हायरस’ तयार केला आहे.

वैज्ञानिक इतिहासात पहिल्यांदाच ‘एआय’ने संपूर्ण ‘व्हायरल जीनोम’ स्वतः डिझाईन केला असून त्याने प्रयोगशाळेत यशस्वीपणे कामही केले आहे. हा व्हायरस माणसे, वनस्पती किंवा प्राण्यांना कोणताही त्रास किंवा नुकसान पोहोचवत नाही. हे व्हायरस केवळ जीवाणूंना संक्रमित करतात. या संशोधनासाठी संशोधकांनी ‘ईव्हीओ १’ आणि ‘ईव्हीओ २’ नावाच्या ‘जीनोम लँग्वेज मॉडेल’चा वापर केला. ज्याप्रमाणे ChatGPT इंटरनेटवरील पुस्तके आणि माहिती वाचून लिहिण्यास शिकतो, तसेच या मॉडेल्सनी मानव, वनस्पती, बॅक्टेरिया आणि व्हायरसच्या डीएनए सीक्वेन्सच्या पॅटर्नचा सखोल अभ्यास केला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर ‘एआय’ने व्हायरसचे अनेक संभाव्य जेनेटिक कोड तयार केले. वैज्ञानिकांनी यातील ३०० सर्वांत अचूक डिझाईन्स निवडल्या आणि कृत्रिम ‘डीएनए’ तयार करून तो E. coli बॅक्टेरियामध्ये टाकला. या प्रयोगातून १६ असे व्हायरस तयार झाले जे बॅक्टेरियाच्या आत जिवंत राहिले आणि त्यांनी स्वतःची संख्य वाढवण्यात यश मिळवले.

वैज्ञानिकांच्या मते भविष्यात आजारांवर उपचार करण्याच्या पद्धतींमध्ये ही तांत्रिक क्रांती ठरू शकते.

सुपरबग्सवर प्रभावी उपचार : ज्या धोकादायक बॅक्टेरियांवर अँटिबायोटिक (प्रतिजैविके) औषधांचा प्रभाव पडत नाही अशा बॅक्टेरियांना मारण्यासाठी या एआय-निर्मित व्हायरसचा वापर केला जाऊ शकतो. लाखो वर्षांचा प्रवास काही क्षणांत एआयने व्हायरसच्या आत अशी जनुकीय वैशिष्ट्ये तयार केली आहेत, जी निसर्गामध्ये नैसर्गिकरीत्या विकसित होण्यासाठी कदाचित लाखो वर्षे लागली असती. जरी हा प्रयोग पूर्ण सुरक्षेसह उच्च दर्जाच्या बायो-लॅबमध्ये करण्यात आला असला, तरी यामुळे ‘जैविक सुरक्षेबाबत’ नवीन चर्चा सुरू झाली आहे. संशोधकांनी स्पष्ट केले आहे की, हे तंत्रज्ञान सध्या मानवाला नुकसान पोहोचवणारे व्हायरस किंवा गुंतागुंतीच्या पेशी बनवण्याच्या स्थितीत नाही. तरीही, सायबर सुरक्षेप्रमाणेच आता ‘एआय’च्या ‘बायो-रिसर्च’ मधील वापराबाबत कडक कायदे व नियम बनविण्याची मागणी जगभरातून जोर धरत आहे.

### शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण

## मनोज पाटील, शरद शिंदे, विनोद तराळसह संशयितांचे जामीन फेटाळले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या १७० कोटी रुपयांच्या बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणात नाशिक रोड सत्र न्यायालयाने शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी १५ स्वतंत्र आदेश दिले. संशयित संस्थाचालक शरद दयाराम शिंदे, मनोज रामकृष्ण पाटील, विनोद तराळ यांच्यासह एकूण १५ जणांचे अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने कठोर आधार घेत फेटाळले. जामीन फेटाळताना न्यायालयाने तपासाची व्याप्ती, संघटीत गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराचे भीषण स्वरूप लक्षात घेत शिक्षण व्यवस्थेवर गंभीर ताशेरे ओढले.

**१५ अर्ज फेटाळले**

**मनोज पाटील, शरद शिंदे, विनोद तराळ, प्रदीप शिंगणे, राहुल पवार, लेखाधिकारी मनीष कदम, अविनाश पाटील, शिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण, किरण कुंवर, प्रवीण अहिरे, भास्कर पाटील, देवीदास महाजन, मनिक्षी गिरी, अमोल कुलकर्णी, रामकृष्ण पाटील या १५ संशयितांचा जामीन अर्ज फेटाळला तर शिक्षक अतुल पवार, उमेश पवार यांचा जामीन मंजूर करण्यात आला.**

अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना न्यायाधीशांनी अत्यंत कडक शब्दांत सुनावले आहे. कोणत्याही राष्ट्राचा विनाश करण्यासाठी अणुबॉम्बची अजिबात गरज नसते. त्या देशाच्या शिक्षण व्यवस्थेत खोलवर भ्रष्टाचार रुजवणेच पुरेसे असते. ज्ञानाची मंदिरे असणाऱ्या पवित्र शाळेच्या प्रांगणात जेव्हा गुन्हेगारी कृती घडते, तेव्हा केवळ त्या वास्तूची पवित्रता नष्ट होत नाही, तर भावी पिढीच्या चारित्र्याचा आणि पर्यायाने राष्ट्राच्या भविष्याचा पाया ढासळतो. हा निव्वळ तांत्रिक स्वरूपाचा गुन्हा नसून सरकारी तिजोरीची आणि जनतेच्या पैशांची झालेली पद्धतशीर लुटालूट आहे, असा थेट निष्कर्ष न्यायालयाने नोंदविला आहे.

न्यायाधीश के. जी. जोशी यांनी हे आदेश पारीत केले आहेत. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाचे पी. चिदंबरम विरुद्ध ईडी (२०१९) व स्टेट विरुद्ध अनिल शर्मा (१९९७) या निवाड्यांचा हवाला देत न्यायालयाने स्पष्ट केले, की पद व प्रभावाचा वापर करून इलेक्ट्रॉनिक पुरावे, साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिस कोठडीत चौकशी आवश्यक असल्याचे नमूद करत न्यायालयाने दोघांचे जामीन अर्ज फेटाळले.

असे आहेत न्यायालयाचे निष्कर्ष
शरद दयाराम शिंदे : संशयित शिंदे हा शैक्षणिक संस्थेचा संचालक असून त्याने मध्यस्थ (एजंट) म्हणूनही काम केले. पोलिसांनी जप्त केलेले शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे आवक, रजिस्टर आणि नाशिक रोड पोलिस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ८ शाळांमधील ५१ कर्मचाऱ्यांच्या नावांत फेरफार करून त्या नोंदी घुसडण्यात आल्याचे उघड झाले. शिंदे याच्या कस्टडीयल चौकशीशिवाय या तपासाचे मूळ गाठता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.
मनोज रामकृष्णा पाटील : संशयित पाटील हा तीन शाळांशी संबंधित घोटाळ्यात अडकला आहे. सुयोग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक शाळा बोरणार, जि. जळगाव, स्पर्श फाऊंडेशन संचलित सर्वज्ञ माध्यमिक शाळा बोरगाव, ता. धरणगाव, स्वामी समर्थ माध्यमिक शाळा, पारोळा या त्या शाळा आहेत. तपासातील धक्कादायक बाब म्हणजे श्री स्वामी समर्थ माध्यमिक शाळा, पारोळा ही शाळा प्रत्यक्षात अस्तित्वातच नाही. पाटील याच्याशी संबंधित ४८ कर्मचारी या गुन्ह्यात अडकले असून, २१ कर्मचाऱ्यांची शालार्थ आयडी पूर्णपणे बोगस असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## अमळनेरमध्ये आर. के. नगरातून मारुती सुझुकी इको गाडीची चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहरातील आर. के. नगर परिसरातून एक सिल्वर रंगाची मारुती सुझुकी इको ही गाडी चोरीस गेल्याची घटना घडली. ही घटना शुक्रवार, दि. ७ ऑगस्टच्या रात्री साडेतीनच्या सुमारास घडली.

सदर मारुती सुझुकी इको सिल्वर रंगाची गाडी (एमएच १९-डीव्ही ८४२९) आर. के. नगर परिसरात रात्रीच्या सुमारास पार्क केली असताना चोरट्यांनी स्कोडा कंपनीच्या गाडीतून येऊन सदर गाडी चोरून नेली. सदर स्कोडा गाडी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, यातून उतरून काही लोक इको गाडीकडे जाताना दिसत आहेत. त्यानंतर या दोन्ही गाड्या धुळे रस्त्यावरील पेट्रोलपंप व एमआयडीसी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात धुळ्याकडे जाताना दिसत आहेत. तसेच याच दिवशी अमळनेर शहरात बोरसे गल्लीमध्य दोन घरे फोडली असून या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सदर स्कोडा गाडी दिसून आली आहे. याच रात्री जानवे येथेही दोन घरे फुटली आहेत. सदर चोरट्यांनीच ही घरफोडी केली असावी, असा पोलिसांचा अंदाज आहे.

याबाबत गाडी मालक सुनील शर्मा (रा. आर. के. नगर) यांनी अमळनेर पोलिसांत चोरीची तक्रार दिली आहे. मात्र, अद्याप गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.

### बालिकेचा आजोबाकडून विनयभंग; पोलिसांत गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एका नऊ वर्षांच्या बालिकेचा बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी पहाटे तीनच्या सुमारास आजोबानेच विनयभंग केला. ही घटना शहरातील धरणगाव रस्त्यावरील म्हाडा कॉलनीत घडली. मुलीच्या आईने आजोबा विरुद्ध फिर्याद दिल्याने भारतीय न्यायसंहिता कलम ७९ व पोक्सो कायदा कलम १२ प्रमाणे आजोबाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर तपास करीत आहेत.

## चौबारी, गलवाडेतून तीन मोटारसायकल लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील चौबारी व गलवाडे येथून चोरट्यांनी घरांच्या अंगणात उभ्या केलेल्या तीन मोटारसायकल चोरून नेल्या. ही घटना रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी रात्री १० ते पहाटे ३ वाजेदरम्यान घडली.

चौबारी व गलवाडे येथील रहिवाशांच्या अंगणात उभ्या असलेल्या अनुक्रमे २५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची लाल पट्टे असलेली मोटारसायकल (एमएच १९- ईई १८९६), २२ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची सिल्व्हर पट्टे असलेली मोटारसायकल (एमएच १२- एचजी ३२३४) आणि २० हजार रुपये किमतीची निळ्या रंगाची सिल्व्हर पट्टे असलेली मोटारसायकल (एमएच १९- ईसी ७०५) चोरट्यांनी लंपास केल्या.

याबाबत चौबारी येथील शेतकरी रामदास निंबा पाटील यांच्या फिर्यादीवरून चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक साजीद मन्सुरी यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दिनेश पाटील तपास करीत आहेत.

### अमळनेर तालुक्यात दोन आत्महत्या; दोघांचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात दहिवद येथे व शहरात वाडी चौकात दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. दहिवद येथील राहुल दत्तात्रय सोनार (वय २९) याने बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी त्याच्या राहत्या घरी वरच्या मजल्यावर गळफास घेतल्याची माहिती प्राप्त होताच गावातील दत्तात्रय सोनार, शिवाजी पारधी, प्रवीण माळी, चेतन माळी, रोशन यांनी त्याला खाली उतरवून ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अमळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम १९४ प्रमाणे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हवालदार विजय भोई तपास करीत आहेत.

वाडी चौकातील दीपक विठ्ठल गुरव (वय ५२) याने स्वतःच्या राहत्या घरात छताला नायलॉन दोरी बांधून गळफास घेतला. नागरिकांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. त्यांच्या शालकाने अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरून कलम १९४ प्रमाणे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हवालदार प्रमोद पाटील तपास करीत आहेत.

# बाजारातील भेसळयुक्त मिठाईला करा रामराम

## रक्षाबंधनाला घरीच बनवा परफेक्ट ‘काजू कतली’



रक्षाबंधनाचा सण जवळ आला की बाजारात एक वेगळीच लगबग सुरू होते. एकीकडे सुंदर राख्यांची दुकानं सजलेली दिसतात, तर दुसरीकडे मिठाईच्या दुकानांमध्ये विविध प्रकारच्या मिठाईची तयारी सुरू होते. पण सणासुदीच्या काळात मिठाईमध्ये भेसळीच्या बातम्याही सर्रास समोर येतात. अशावेळी आपल्या भावाच्या आरोग्याची काळजी घेत त्याच्यासाठी स्वतःच्या हातांनी मिठाई बनवण्यापेक्षा उत्तम काय असू शकते?

भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा हा सण अधिक खास बनवण्यासाठी तुम्ही घरीच, अगदी दुकानात मिळते तशी चविष्ट काजू कतली बनवू शकता. चला तर मग जाणून घेऊया त्याची सोपी कृती.

**काजू कतलीसाठी लागणारे साहित्य :**
**काजू :** १ कप (चांगल्या प्रतीचे)
**साखर :** अर्धा कप (तुम्ही तुमच्या आवडीनुसार कमी-जास्त करू शकता)
**पाणी :** पाव कप
**वेलची पूड :** चिमूटभर (ऐच्छिक)
**तूप :** १ चमचा (पसरविण्यासाठी)

**काजू कतली बनविण्याची कृती :**

१) काजूची पावडर बनवा : सर्वप्रथम काजू मिक्सरमध्ये घालून त्याची बारीक पावडर तयार करा. मात्र, मिक्सर एकाच वेळी जास्त वेळ फिरवू नका, नाहीतर काजू तेल सोडतील. मिक्सर ‘पल्स मोड’वर थांबून थांबून चालवा. तयार पावडर चाळणीने चाळून घ्या.

२) साखरेचा पाक तयार करा : एका पॅनमध्ये साखर आणि पाणी एकत्र करून गॅसवर ठेवा. साखर पूर्णपणे विरघळेपर्यंत ढवळत राहा. आपल्याला एक तारी पाक बनवायचा आहे. पाक तयार झाला आहे की नाही हे तपासण्यासाठी, चमच्याने पाकाचा एक थेंब बोटावर घेऊन तपासा, एक तार तयार झाली पाहिजे.

३) मिश्रण एकत्र करा : पाक तयार झाल्यावर गॅसची आच मंद करा आणि त्यात हळूहळू काजूची पावडर टाका. मिश्रण सतत ढवळत राहा, जेणेकरून त्यात गुठळ्या होणार नाहीत.

४) मिश्रण शिजवा : आता यात वेलची पूड घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत शिजवा. मिश्रण पॅनच्या कडा सोडू लागले आणि त्याचा एक गोळा तयार होऊ लागला की गॅस बंद करा.

५) मिश्रण मळून घ्या : तयार मिश्रण एका ताटात किंवा बटर पेपरवर काढून घ्या. थोडे थंड झाल्यावर हाताला तूप लावून ते मऊ होईपर्यंत चांगले मळून घ्या.

६) लाटून कापून घ्या : आता या गोळ्यावर बटर पेपर ठेवून लाटण्याच्या मदतीने हलक्या हाताने पोळीसारखे लाटून घ्या. तुम्हाला हव्या त्या जाडीनुसार लाटा. त्यानंतर सुरीने त्याला डायमंड (चौकोनी) आकारात कापून घ्या.

अशा प्रकारे तुमची घरच्या घरी, कोणत्याही भेसळीशिवाय स्वच्छ आणि स्वादिष्ट काजू कतली तयार आहे. या रक्षाबंधनाला भावाचे तोंड स्वतःच्या हातांनी बनविलेल्या या खास मिठाईने गोड करा आणि सणाचा आनंद द्विगुणीत करा.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# इंजीनियरिंग की नौकरी छोड़ की यूपीएससी तैयारी

## पहले आयपीएस फिर बने आयएएस अधिकारी, जानिए दीपांकर चौधरी की कहानी

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जब किसी का लक्ष्य आसमान से भी ऊंचा होता है, तो वह नीचे गिरने से कमी नहीं डरता कुछ ऐसा ही लक्ष्य रखा था आईएएस अधिकारी दीपांकर चौधरी ने। आइए जानते है उनकी सफलता की कहानी।

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की परीक्षा देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक मानी जाती है। हर साल लाखों की संख्या में एस्पिरेंट्स इस परीक्षा के लिए आवेदन करते हैं। लेकिन कुछ ही उम्मीदवारों को इसमें सफलता मिलती है। जब किसी का लक्ष्य आसमान से भी ऊंचा होता है, तो वह नीचे गिरने से कमी नहीं डरता कुछ ऐसा ही लक्ष्य रखा था आईएएस अधिकारी दीपांकर चौधरी ने, जो पहले आईपीएस बने और फिर कड़ी मेहनत कर आईएएस अफसर बने।

आईएएस दीपांकर की प्रारंभिक शिक्षा झारखंड से हुई। इसके बाद वे दिल्ली आ गए और बाकी की पढ़ाई उन्होंने दिल्ली से की। स्कूली शिक्षा पूरी करने के बाद दीपांकर ने वर्ष २०१५ में इंजीनियरिंग की डिग्री प्राप्त की और ग्रेजुएशन पूरा होते ही, उन्होंने नौकरी ज्वाइन कर ली। थोड़े समय नौकरी करने के बाद उन्होंने सिविल सर्विसेज की परीक्षा की तैयारी करने की ठान ली। उन्होंने रात और दिन पढ़ाई कर आखिरकार आईएएस की परीक्षा पास कर ली।

### पहले आयपीएस के लिए हुआ था सिलेक्शन

दीपांकर चौधरी ने साल २०१६ से सिविल सर्विसेज की परीक्षा की तैयारी शुरू की, लेकिन पहले २ प्रयास में दीपांकर के हाथ असफलता लगी। उन्होंने हार नहीं मानी और आखिरकार, उन्हें २०१९ में तीसरे प्रयास में सफलता मिली। इस प्रयास में १६६वीं रैंक के साथ उनका आईपीएस के लिए सिलेक्शन हुआ और दीपांकर ने उसे ज्वाइन करने का फैसला किया।

साथ ही यूपीएससी की परीक्षा की तैयारी जारी रखी, क्योंकि उनका सपना एक आईएएस अधिकारी बनने का था। उन्होंने २०२० के चौथे प्रयास में अपने सपने को पूरा कर दिखाया और इस बार उन्हें सिविल सर्विसेज की परीक्षा में ४२वीं रैंक के साथ आईएएस का पद मिला।



### अन्य लोगों को सलाह

